रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर

## पूर्व परीक्षा ऑक्टोबर - २०१९

**बी. ए. भाग-१ सेमिस्टर – १ (CBCS)**

## भूगोल पेपर - १ प्राकृतिक भूगोल

वार व दिनांक: शनिवार १२ ऑक्टोबर २०१९ एकूण गुण : ५०

वेळ : १२ ते २

सूचना : १. सर्व प्रश्न आवश्यक आहेत. २. आवश्यक तेथे नकाशे व आकृत्या काढा,
३. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात. ४. नकाशा स्टेन्सील वापरण्यास परवानगी आहे.

---

**प्रश्न १. खालील प्रश्नासाठी योग्य पर्याय निवडा.** १०

१. खालीलपैकी कोणत्या घटकाचा प्राकृतिक भूगोलामध्ये अभ्यास होत नाही ?
अ. पर्वत ब. पठारे क. मानवी वसाहती ड. भूकंप

२. भूरुपांच्या कोणत्या श्रेणीमध्ये पर्वतांचा समावेश होतो ?
अ. प्राथमिक ब. द्वितीयक क. तृतीयक ड. चतुर्थक

३. वातावरणाच्या घटनेमध्ये सर्वाधिक प्रमाण कोणत्या वायूचे आहे ?
अ. ऑक्सीजन ब. नायट्रोजन क. कार्बन डायऑक्साईड ड. ओझोन

४. वातावरणातील विविध आविष्कार कोणत्या थरामध्ये घडून येतात?
अ. तपांबर ब. स्थितांम्बर क. दलांबर ड. बाह्यांबर

५. ४०$^0$ दक्षिण अक्षवृत्तीय प्रदेशातून वाहणाऱ्या वाऱ्याना काय म्हणतात?
अ. झोंबणारे चाळीस ब. गर्जणारे चाळीस क.खवळलेले चाळीस ड. शांत चाळीस

६. पृथ्वीच्या पृष्ठभागावर हवेच्या दाबाचे एकूण किती पट्टे आहेत ?
अ. सहा ब. सात क.आठ ड. नऊ

७. भूकंपाच्या सर्वाधिक विध्वंसक लहरी कोणत्या आहेत ?
अ. प्राथमिक ब. द्वितीयक क.भूपृष्ठ ड. तृतीयक

८. इटलीतील एटना हा ज्वालामुखी कोणत्या प्रकारचा आहे ?
अ. जागृत ब. मृत क.निद्रिस्त ड. भेगी

९. ‘अपक्षय चक्र’ हा सिद्धांत कोणी मांडला आहे ?
अ. वेगनर ब. वेबर क.डेव्हीस ड. पैंक

१०. ‘लोएस मैदाने’ हा भूआकार वाऱ्याच्या कोणत्या कार्यामुळे निर्माण होतो ?
अ. खणन ब. वहन क.खणन व वहन ड. संचयन

**प्रश्न २. खालीलपैकी कोणत्याही चार टीपा लिहा.** २०

अ. प्राकृतिक भूगोलाचे महत्व ब. व्यापारी वारे

क. भूकंपाची कारणे ड. विदारणाचे प्रकार

इ. वातावरणाची रचना ई. अपक्षय चक्र

**प्रश्न ३ . अ. प्राकृतिक भूगोल म्हणजे काय? प्राकृतिक भूगोलाच्या शाखा स्पष्ट करा. किंवा** १०

**ब. सौरशक्ती म्हणजे काय? सौरशक्तीच्या वितरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.** १०

**प्रश्न ४ . अ. वेगनरचा भूखंडवहन सिद्धांत स्पष्ट करा . किंवा** १०

**ब. नदीच्या खनन कार्यामुळे निर्माण होणाऱ्या भूमिस्वरुपांची माहिती लिहा.** १०

********